लोकपत्र दिनांक :- 01/03/2021

# मटका, जुगार वाल्यांविरूद्ध पोलिसांची कारवाई

## जिल्ह्यातून दोघेजण हद्दपार



**नांदेड/प्रतिनिधी**

शहर आणि जिल्ह्यात मटका, जुगार खुलेआमपणे खेळला जात आहे. यावर कारवाईलाही आरोपी जुमानत नसल्याने अशा मटका जुगार घेणाऱ्याविरूद्ध पोलिसांनी आता हद्दपारीचे हत्यार उपसले असून वजिराबाद पोलिसांनी दोघाजणाविरूद्ध प्रस्ताव पाठविला होता. त्याला मंजूरी मिळाली असून मटका, जुगार घेणाऱ्या दोघांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. यामुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी कर्तव्य पार पाडत आहेत. मटका जुगार अड्ड्यांमुळे अनेक गोरगरीबांचे संसार उद्धवस्त होत आहेत. तर मटका, जुगारांच्या पैशांच्या कारणावरून बऱ्याचदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही दिवसांपुर्वी तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी मटका किंगच्या विरोधात तडीपारची कारवाई केल्यानंतर काही प्रमाणात मटका, जुगार बंद झाला होता. मात्र पुन्हा शहरातील गल्लीबोळात मटका जुगार सुरू आहे. मुंबई, कल्याण, मीलन, मेन बाजार, टाईम बाजार आदी मटका, जुगार जिल्ह्यात खेळविला जातो. अशा आरोपींवर कारवाई करूनही सदरील आरोपी सुटल्यानंतर पुन्हा मटका, बुकी थाटात असतात. याला आळा बसावा म्हणून जिल्हा पोलिसांनी वारंवार मटका, जुगार घेणाऱ्या अभिलेखावरील गुन्हेगारांवर प्रतिबंध कारवाई सुरू केली आहे. शहराचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांनी अभिलेखावरील आरोपीच्यासंदर्भात सुचना दिल्यानंतर वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, गुन्हे शोध पथकाने कारवाई करून विक्रम नंदलाल यादव, विजय नागोराव कलाल रा. जुना मोंढा या दोघांविरोधात हद्दपारीचा प्रस्ताव दाखल केला होता. उपविभागीय दंडाधिकारी लतीफ पठाण यांनी या दोघांना सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. हद्दपारीचे आदेश प्राप्त होताच वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक सुनील पुंगळे, सोमनाथ शिंदे, शेख अब्दुल, दत्तराम जाधव, विजयकुमार नंदे, गजानन किडे, संजय जाधव, मनोज परदेशी यांच्यासह आदींनी दोन्ही आरोपींना जिल्ह्यातून हद्दपार केले असून एकाला औरंगाबाद तर दुसऱ्याला तेलंगणा राज्यातील बोधन येथे सोडण्यात आले आहे. दरम्यान पोलिसांच्या या हद्दपारीच्या कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.